आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
गुरुवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

- १४० कोटी देशवासी एकजुटीनं २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करतील असा पंतप्रधानांना विश्वास/ येत्या पाच वर्षांत वैद्यकीय शिक्षणासाठी ७५ हजार नव्या जागा मिळणार असल्याची केली घोषणा.
- सामान्य माणसांच्या जीवनात परिवर्तन व्हावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करु- नागपुरातील स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.
- नागपूरच्या कोराडी इथल्या क्रिडांगणातून राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडतील- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास,वीरांगना राणी अवंतीबाई तालुका क्रिडा संकुल सुविधांचे केलं उद्घाटन.
- नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमानाचा येल्लो अलर्ट.

****

स्वातंत्र्य दिन-राष्ट्रीय

देशातले १४० कोटी नागरिक एकजुटीने वागले तर, प्रत्येक आव्हानावर मात करत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्राचं स्वप्न साकार होऊ शकेल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त सलग ११व्यांदा मोदी यांनी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकावला, त्यानंतर ते देशाला संबोधित करत होते. विकसित भारतात सर्वसामान्यांच्या जगण्यात सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असावा, आणि लोकांना गरज असेल तेव्हाच सरकारने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

समान नागरी कायद्याची आवश्यकता असल्याचं मत सर्वोच्च न्यायालयानं सातत्यानं मांडलं असून यावर व्यापक चर्चा होण्याची गरज आहे असं ते म्हणाले. प्रत्येक धर्माचे वेगवेगळे वैयक्तिक कायदे असल्यावर समाजात फूट पडते, म्हणून धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधली दरी कमी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशात वारंवार निवडणुका होत राहिल्या तर, प्रत्येक विकासकामाकडे निवडणुकांच्या अनुषंगानेच पाहिलं जातं, म्हणून एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा असं ते म्हणाले.

भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा प्रामाणिकपणे सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी लाल किल्ल्यावरून दिली. आजवरच्या प्रयत्नांमुळे देशाचं दरडोई उत्पन्न दुप्पट करण्यात सरकारला यश आल्याचंही ते यावेळी म्हणाले. देशातल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जाण्याची गरज पडू नये, आणि त्या कारणापोटी मध्यमवर्गीयांवर खर्चाचा बोजा पडू नये याकरता येत्या पाच वर्षांत वैद्यकीय प्रवेशाच्या ७५ हजार नव्या जागा तयार करण्याची घोषणाही त्यांनी केली.

स्वातंत्र्य दिन-मुख्यमंत्री/राज्यपाल

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात विधान भवन इथं ध्वजारोहण संपन्न झालं. राज्यपाल राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि इथल्या नागरिकांच्या कल्याणासाठी राज्य शासन वचनबद्ध आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी या सर्व घटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासाला चालना देण्याचे काम सुरु आहे. विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासनाने राबविलेल्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मंत्रालय इथं मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने भरीव कामगिरी केली आहे. विदेशी गुंतवणूक, समाजातील दुर्बल, गोरगरीबांसाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण योजना या माध्यमातून नागरिकांप्रती असणारी बांधीलकी दाखवून दिली आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवून जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्यासाठी आगेकूच सुरु आहे. त्यामध्ये आपल्या राज्याचा वाटा मोठा असणार आहे. राज्याची वाटचाल त्यादिशेने सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.

स्वातंत्र्य दिन नागपूर

अनेकांच्या बलिदानातून, संघर्षातून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. यासाठी अनेकांनी यातना सहन केल्या. भारतीय स्वातंत्र्याच्या आजवरच्या वाटचालीत आपण जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून एक मैलाचा टप्पा गाठला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसीत भारत हे ब्रीद घेऊन सर्वसामान्यांच्या विकासासाठी कटिबध्दता ठेवली आहे. प्रगतीचे विविध टप्पे गाठतांना सामान्य माणसाच्या जीवनात परिर्वतन व्हावे यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. 78व्या स्वातंत्र्या दिनानिमित्त

आयुक्त कार्यालय येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले की -

*आज मोठ्या प्रमाणात आपल्या समृद्धी सारखा महामार्ग असेल सिंचनाचे विविध काम असतील वैनगंगा नळगंगा सारख्या **88** हजार कोटी रुपयाचा प्रकल्प असेल ज्या प्रकल्पाच्या माध्यमाने माध्यमाने संपूर्ण विदर्भाच्या दुष्काळ हा नेहमी करता भूतकाळ होणार आहे अशा प्रकारचे प्रकल्प असतील मेगा टेक्स्टाईल पार्क असेल मेट्रो असेल जवळपास गेल्या तीन महिन्यांमध्ये पन्नास हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आलेली गुंतवणूक असेल अशा अनेक गोष्टी ज्या आहेत या गोष्टी आज विकासाकडे आपली कशी वाटचाल चाललेली आहे हे दर्शवणारे आहे.*

येणाऱ्या पिढ्यांकडे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्याचं आणि अबाधित राखण्याचं महत्त्वपूर्ण दायित्व आहे. संपूर्ण जगात अनेक असे देश असतात जे इतर देशांवर वर्चस्व स्थापित करू इच्छितात अशा देशांपासून आपल्या देशाची रक्षा देखील करावी लागते. यासाठी सतत सजग राहून संवैधानिक अनुशासनाचे पालन करावे लागते. देशाचा सामान्य व्यक्ती जेव्हा स्वतंत्रते मधील 'स्व' वर भर देऊन आपले कर्तव्य पार पाडतो त्यातच स्वातंत्र्य सुरक्षित राहते असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर संघचालक डॉक्टर मोहन भागवत यांनी केले. ते नागपुरातील महाल इथं धवजवंदन झाल्यांनतर संबोधित करत होते. ७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्यसाधून १५ ऑगस्टला "एक वादळ भारताचं" या तरुणांच्या चळवळीच्या वतीने फुटाळा तलाव परिसरात आज सकाळी 'राष्ट्रीय ध्वज मार्च पास्ट' चे आयोजन करण्यात आलं. नागपूर आकाशवाणी कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, इगनू क्षेत्रीय कार्यालय, वन भवन आणि अन्य शासकीय नी खासगी कार्यालयात स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात पार पडला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने केंद्र आणि राज्य शासनाद्वारे जाहीर करण्यात आलेल्या ‘हर घर तिरंगा’ या अभियानांतर्गत तायवाडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व तायवाडे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरकरांन जिल्हाधिकारी विपिन ईटनकर यांना राष्ट्रीय ध्वज हस्तांतरित करून तिरंगा या राष्ट्रीय उपक्रमाची नागपूर अवलोकन करण्यात आलं. संपूर्ण विदर्भात स्वतंत्रता दिवस उत्साहात पार पडला.

लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'  योजनेच्या पहिल्या हप्त्याचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आतापर्यंत 80 लाखापेक्षा अधिक पात्र महिलांना लाभ देण्यात आला आहे, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. मंत्री तटकरे म्हणाल्या की काल  लाभ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आतापर्यंत राज्यात 80 लाख महिलांच्या बँक खात्यात  2 महिन्यांच्या लाभाची रक्कम 3 हजार रुपये जमा करण्यात आली आहे. उर्वरित पात्र महिलांना सुद्धा 17 ऑगस्ट पर्यंत हा लाभ मिळणार आहे. 14 ऑगस्टपर्यंत 1 कोटी 62 लाखापेक्षा अधिक महिलांची नोंदणी झाली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी  नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितल की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'अंतर्गत महिलांच्या खात्यात पैसे जमा व्हायला सुरुवात झाली असून 17 ऑगस्टपर्यंत म्हणजेच रक्षाबंधनाआधी 1 कोटी महिलांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत आणि यानंतरही ज्यांचे अर्ज येतील त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे.

हवामान

काही दिवस पावसानं उघडीप  दिल्यानंतर आज दुपारी नागपुरात मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाला सुरुवात झाली.  विदर्भात अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून, उद्या देखील वाशिमसह  याच जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा हवामान खात्याने दिलाय. येत्या काही तासात, विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, आणि वाशीम जिल्ह्यांमध्येअनेक ठिकाणी तर  नागपूर, भंडारा, गोंदिया चंद्रपूर, वर्धा इथं काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

रानभाजी महोत्सव

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा प्रकल्प संचालक (आत्मा) आणि अकोला जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने आत्मा कार्यालयाच्या प्रांगणात रानभाजी महोत्सव आयोजित करण्यात आला. त्याला अकोलेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला.  यावेळी रानावनातील विविध भाज्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. करवंद, अंबाडी, करटुले, सुरण, दिंडा, केणा, टाकळा, कुडा, गुळवेल, घोळ, भुईआवळा शेवगा अशा नानाविध प्रकारच्या रानभाज्या विविध कक्षांत मांडण्यात आल्या होत्या. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांच्यासह विविध अधिकारी आणि मान्यवरांनीही रानभाजी महोत्सवाला भेट दिली.

अतिसार

अमरावती, प्राथमिक आरोग्य केंद्र हतरु आणि चुरणी या गावात सोमवारी **24** रुग्णांना अचानक अतिसार आणि पोटदुखी होत असल्याची माहिती प्राप्त होताच जिल्हा आरोग्य अधिकारी आणि त्यांच्या चमूने गावाला तात्काळ भेट दिली. भेटी दरम्यान साथरोग नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले यांनी संबंधिताना दिली . या ठिकाणी जनजागृती करुन समुपदेशन करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश असोले यांनी दिली.

*****